दै. पुढारी दि. 15/12/2021

## संक्षिप्त

# ओंकार महाविद्यालयाच्या खेळाडूंचे मैदानी स्पर्धेत यश

**गडहिंग्लज :** येथील ओंकार शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या खेळाडूंनी कोल्हापूर विभागीय मैदानी स्पर्धेत दोन सुवर्ण, दोन रौप्य व एक कांस्यपदक मिळून यश संपादन केले. यामध्ये विवेक मोरे (बी.ए भाग २) याने १० हजार मी. धावणेमध्ये सुवर्णपदक, तर ५ हजार मी.मध्ये रौप्यपदक मिळविले. रोहिणी पाटील (बी.ए भाग ३) हिने ८०० मी. धावणेत सुवर्णपदक, ४०० मी. धावणेत रौप्य तर १५०० मी. धावणेत कांस्यपदक मिळविले. मुलांच्या संघाने ४ बाय ४०० रिले प्रकारात चौथा क्रमांक मिळविला. वैभव पाटील, विवेक मोरे, साहिल आडाव, वैभव तिप्पे, अभिषेक कुंभार यांचा समावेश होता. यामधील रोहिणी पाटील व विवेक मोरे यांची १५ ते १७ डिसेंबर दरम्यान कराड येथे होणाऱ्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय मैदानी स्पर्धेस निवड झाली आहे. या खेळाडूंना संस्थाध्यक्ष राजन पेडणेकर, प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश चव्हाण, डॉ. महेंद्र जाधव, कविता पोळ, प्रकाश कांबळे यांचे प्रोत्साहन तर शारीरिक शिक्षण संचालक सुरेश धुरे यांचे मार्गदर्शन लाभले.



**विवेक मोरे**



**रोहिणी पाटील**